असा. क्र. १९ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

**प्राधिकृत प्रकाशन**

**मंगळवार, एप्रिल २९, २००३/वैशाख ९, शके १९२५**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम**

### अनुक्रमणिका


| | पृष्ठे |
|---|---|
| सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७.––महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम | १४१-१४३ |


दिनांक २२ एप्रिल २००३ रोजी राष्ट्रपतींनी संमती दिलेला महाराष्ट्र राज्य विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**प्रतिमा उमरजी,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

### सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७.

(मा. राष्ट्रपतींची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक २९ एप्रिल २००३ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

१९६१ चा महा. २७. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या बावन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :––

संक्षिप्त नाव व प्रारंभ. **१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) (सुधारणा) अधिनियम, २००१ असे म्हणावे.

(२) तो, राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास अंमलात येईल.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम २८-१अअ ची सुधारणा. **२.** महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ याच्या कलम २८-१ अअ मधील,— १९६१ चा महा. २७.

(क) पोट-कलम (२) मधील,—

(एक) खंड (ब) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (ब-१) महामंडळाकडे (कंपनी धरून) सध्या निहित असलेली सर्व जमीन किंवा तिचा भाग, कोणत्याही सार्वजनिक प्रयोजनासाठी काढून घेणे राज्य शासनास आवश्यक वाटत असेल तर, किंवा ";

(दोन) अखेरीच्या ओळीतील " कच्च्या मालाचे उत्पादन चालू ठेवण्याकरिता स्वतः उपाययोजना करता येईल " या मजकुरानंतर पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

" किंवा पोट-कलमे (३) आणि (३अ) मध्ये तरतूद केलेल्या रीतीने जमिनीची विल्हेवाट करता येईल ; ";

(ख) पोट-कलम (३) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

"(३) राज्य शासनास, पोट-कलम (४) च्या तरतुदींना अधीन राहून, पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या जमिनीत हितसंबंध असलेल्या व्यक्तींच्या मतांविषयी खात्री करून घेतल्यानंतर, जिने आपली जमीन उपक्रमास पूर्वी पट्ट्याने दिलेली असून, जिला आपल्या वैयक्तिक लागवडीसाठी त्या जमिनीची गरज आहे अशा (सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नसलेल्या) व्यक्तीला, या अधिनियमातील कराननिविष्ट केलेल्या कमाल मर्यादेपर्यंतचे क्षेत्र किंवा अशा व्यक्तीने उपक्रमास पट्ट्याने दिलेल्या जमिनीचे प्रत्यक्ष क्षेत्र, यांपैकी जे कमी असेल तितकी जमीन, ह्याबाबतीत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा इतर अटींस व शर्तीस अधीन राहून देता येईल :

परंतु, ज्या व्यक्तीने १९ सप्टेंबर, १९७५ रोजी असल्याप्रमाणे तिने धारण केलेल्या जमिनीच्या बाबतीत, या अधिनियमाच्या कलम १२ किंवा १२अ अन्वये विवरण दाखल करणे आवश्यक होते आणि जिची जमीन, या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये अतिरिक्त असल्याचे घोषित करण्यात आले होते, अशी व्यक्ती अशी जमीन दिली जाण्यास हक्कदार असणार नाही :

परंतु आणखी असे की, महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) (सुधारणा) अधिनियम, २००१ याच्या प्रारंभापासून ९० दिवसानंतर अशी जमीन देण्याकरिता ज्या व्यक्तीने अर्ज केला असेल, अशी व्यक्ती अशी जमीन देण्यासाठी पात्र असणार नाही. "; २००३ चा महा. १७.

(ग) पोट-कलम (३) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

"(३अ) पोट-कलम (३) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनाला, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित याकडे निहित असलेल्या जमिनींची, याबाबतीत विशेष किंवा सर्वसाधारण आदेशाद्वारे, राज्य शासनाला विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा अटींवर व शर्तींवर, सार्वजनिक प्रयोजनासाठी, विल्हेवाट करता येईल. " आणि जेव्हा अशी विल्हेवाट

शासकीय अथवा निमशासकीय संस्थांव्यतिरिक्त इतर संस्थांना करण्यात येईल तेव्हा ती,
मुंबई मुद्रांक अधिनियम. १९५८ अन्वये करण्यात आलेल्या मुंबई मुद्रांक (मालमत्तेचे खरे
१९५८ बाजारमूल्य ठरविणे) नियम, १९९५, अनुसार ठरविण्यात आलेल्या बाजारमूल्यानुसार अथवा
चा ६०. जाहीर लिलावाने करण्यात येईल.''

**स्पष्टीकरण.**---या पोट-कलमाच्या प्रयोजनांकरिता '' सार्वजनिक प्रयोजनासाठी जमिनींची १९६६ चा
विल्हेवाट करणे '' या शब्दप्रयोगाचा अर्थ, शैक्षणिक, वैद्यकीय किंवा सार्वजनिक आरोग्य संस्था महा.३७.
किंवा समाजकल्याण आणि सांस्कृतिक कार्य संस्था याच्याकरिता सार्वजनिक प्रयोजनासाठी किंवा १८८४ चा १.
महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ याच्या कलम २२ खालील विकास १९६५ चा
योजनेमध्ये नमूद केलेल्या इतर कोणत्याही प्रयोजनासाठी किंवा भूमि संपादन अधिनियम, १८९४ महा. ४०.
याच्या कलम ३ च्या खंड (फ) मध्ये समावेश असलेल्या, महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती १९४९ चा
व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ याच्या कलम २ च्या खंड (२४) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे मुंबई ५९.
नगर परिषदा व नगर पंचायती यांच्या नगरपालिका क्षेत्रापासून पाच किलोमीटरच्या परिसरात १९५० चा
असलेल्या, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ याच्या कलम ३ च्या पोट-कलम मध्यप्रांत व वऱ्हाड
(२) आणि नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४९ याच्या कलम (२) च्या खंड (१०) २.
अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या बृहत नागरी क्षेत्रातील इतर कोणत्याही सार्वजनिक प्रयोजनासाठी
जमिनीची विल्हेवाट करणे, असा आहे.'';

(घ) पोट-कलम (४) मधील '' क्षेत्र व '' हा मजकूर वगळण्यात येईल.

(ङ) पोट-कलम (५) वगळण्यात येईल.

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

मंगळवार, एप्रिल २९, २००३/वैशाख ९, शके १९२५

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग आठ

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधी व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).


In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Agricultural Lands (Ceiling on Holdings) (Amendment) Act, 2001 (Mah. Act. No. XVII of 2003), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

PRATIMA UMARJI,
Principal Secretary to Government,
Law and Judiciary Department.

---

## MAHARASHTRA ACT No. XVII OF 2003.

*(First published, after having received the assent of the President in the "Maharashtra Government Gazette", on the 29th April 2003).*

An Act further to amend the Maharashtra Agricultural Lands (Ceiling on Holdings) Act, 1961.

Mah. XXVII of 1961. WHEREAS it is expedient further to amend the Maharashtra Agricultural Lands (Ceiling on Holdings) Act, 1961, for the purposes hereinafter appearing; It is hereby enacted in the Fifty-second Year of the Republic of India as follows :—

**1.** (*1*) This Act may be called the Maharashtra Agricultural Lands (Ceiling on Holdings) (Amendment) Act, 2001. Short title and commencement.

(*2*) It shall come into force on such date as the State Government may, by notification in the *Official Gazette*, appoint.

Amendment of section 28-1AA of Mah. XXVII of 1961.

**2.** In section 28-1AA of the Maharashtra Agricultural Lands (Ceiling on Holdings) Act, 1961,— Mah. XXVII of 1961.

(*a*) in sub-section (*2*),—

(*i*) after clause (*b*), the following clause shall be inserted, namely :—

" (*b-1*) it is considered necessary by the State Government for any public purpose to take away all or part of the land presently vested in the Corporation (including a company), or " ;

(*ii*) at the end, for the words " production of raw material ", the following shall be substituted, namely :—

" production of raw material or may dispose of the land in the manner as provided in sub-sections (*3*) and (*3A*) ";

(*b*) for sub-section (*3*), the following sub-section shall be substituted, namely :—

" (*3*) The State Government may, subject to the provisions of sub-section (*4*), after ascertaining the views of the persons interested in the land referred to in sub-section (*1*), also grant such land to a person who had previously leased his land to the undertaking, who (not being a public trust), requires that land for his personal cultivation, to the extent of the ceiling area as stipulated in the Act, or the actual area of the land leased by such person to the undertaking, whichever is less, subject to such other terms and conditions as may be specified in this behalf :

Provided that, a person, who was required to file return under section 12 or 12A of the Act in respect of the lands held by him as on the 19th September 1975, and whose land was declared surplus under the provisions of this Act, shall not be entitled to such grant :

Provided further that, a person, who has applied for grant of such land after 90 days from the commencement of the Maharashtra Agricultural Lands (Ceiling on Holdings) (Amendment) Act, 2001, shall not be eligible for grant of such land. " ; Mah. XVII of 2003.

(*c*) after sub-section (*3*), the following sub-section shall be inserted, namely :—

" (*3A*) Notwithstanding anything contained in sub-section (*3*), the State Government may dispose of the lands vested in Maharashtra State Farming Corporation Limited, for a public purpose, ", and when such disposal is to the institutions other than the Government or Semi-Government institutions, such allotment will be made at the market rate

Bom. LX of 1958.

fixed under the Bombay Stamp (Determination of the Market Value of Property) Rules, 1995 framed under the Bombay Stamp Act, 1958 or by public auction." On such terms and conditions as may be specified by the State Government, by special or general order issued in this behalf.

Mah. XXXVII of 1966.

I of 1894.

Mah. XL of 1965.

Bom. LIX of 1949.

C.P. and Berar II of 1950.

*Explanation.*—For the purposes of this sub-section, the expression " dispose of the lands for the public purpose " means disposal of land, for a public purpose in favour of an educational, medical or public health institution, or social welfare and cultural institution or for any other purpose mentioned in the Development Plan under section 22 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 or for any other public purpose included in clause (*f*) of section 3 of the Land Acquisition Act, 1894, situated within the vicinity of five kilometres from the municipal area of a Council or *Nagar Panchayat* as defined in clause (24) of section 2 of the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships Act, 1965, larger urban area specified under sub-section (*2*) of section 3 of the Bombay Provincial Municipal Corporations Act, 1949 and clause (10) of section 2 of the City of Nagpur Corporation Act, 1949." ;

(*d*) in sub-section (*4*), the words " area and " shall be deleted;

(*e*) sub-section (*5*) shall be deleted.

महसूल व वन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ८ मे २००३

**महाराष्ट्र शेत जमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) (सुधारणा) अधिनियम, २००१.**

क्रमांक आयसीएच. ३४९८/प्र. क्र. २३/भाग एफ/ल-७.—महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) (सुधारणा) अधिनियम, २००१ (२००३ चा २७) च्या कलम १ च्या उप कलम २ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे सदर अधिनियम दिनांक २० मे २००३ पासून लागू करीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

के. बा. लांडगे,
शासनाचे अवर सचिव.

---

**REVENUE AND FORESTS DEPARTMENT**

Mantralaya Annexe, Mumbai 400 032, dated the 8th May 2003

No. ICH. 3498/CR-23/Part F/L-7.—In exercise of the powers conferred by sub-section (*2*) of Section 1 of the Maharashtra Agricultural Lands (Ceiling on Holdings) (Amendment) Act, 2001 (Mah. XVII of 2003), the Government of Maharashtra hereby appoints the 20th May 2003 to be the date on which the said Act, shall come into force.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

K. B. LANDGE,
Under Secretary to Government.

---

**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**

मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२, दिनांक ८ मे २००३

**आदेश**

**महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विनियमन) अधिनियम, १९६३.**

क्रमांक कृबास. २००३/प्र.क्र. २२/११ स.—ज्याअर्थी, कृषि उत्पन्न बाजार समिती, कंधार, जिल्हा नांदेड या बाजार समितीच्या संचालक मंडळाची विहित मुदत संपुष्टात आलेली आहे.